## Dnyandeep Shikshan Prasarak Mandal, Chandrapur

# Dr. Khatri Mahavidyalaya, Tukum Chandrapur

डॉ. खत्री महाविद्यालयात पुष्परचना स्पर्धा व रांगोळी महोत्सव संपन्न

स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयात पुष्परचना स्पर्धा व रांगोळी महोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला. विविध रंगाचा आणि कल्पनांचा मेळ घालुन विद्यार्थ्यांनी आकर्षक रांगोळ्या साकारल्या. या स्पर्धेकरिता परिक्षक म्हणुन छोटुभाई पटेल हायस्कूलचे शिक्षक श्री. सुदर्शन बारापात्रे आणि न्यु इंग्लिश हायस्कुलचे शिक्षक श्री. संजय अंड्रस्कर यांना आमंत्रित करण्यात आल होत.

कार्यक्रमाचे आयोजन वरिष्ठ महाविद्यालयातील संगणकशासत्र विभाग, रसायनशास्त्र विभाग, गृहअर्थशास्त्र विभाग, महिला सुरक्षा व सक्षमीकरण विभाग आणि कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आले. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कला गुणांना प्रोत्साहन मिळाले आणि संघभावना व सांस्कृतिक मूल्ये जपण्याची संधी उपलब्ध झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे सर यांचे शुभहस्ते या स्पर्धेचे उदघाटन झाले. याप्रसंगी आयोजन करणाऱ्या सर्व विभागाचे विभागप्रमुख तसेच कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील बरेच प्राध्यापक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

.






रांगोळी
महोत्सव
२०२५




डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
रांगोळी महोत्सव